# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ७२ वी बैठक दिनांक २७ फेब्रुवारी २०१३

## ठराव

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ७२ वी बैठक दि. २७ फेब्रुवारी २०१३ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | मा. श्री. वल्लभ बेनके | ... | वि.स.स. व उपाध्यक्ष (मकृखोविम) |
| ३. | इं. शि. मा. उपासे | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**विशेष निमंत्रित**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. आनंदराव पाटील | ... | मा. उपाध्यक्ष |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. चं. आ. बिराजदार | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| २. | इं. राजन शहा | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (महामंडळ) अ.का. |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

**सही/-**
**(इंजि. शि. मा. उपासे)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**सही/-**
**(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ७२ वी बैठक दिनांक २७ फेब्रुवारी २०१३

ठराव क्रमांक ७२/१

"नियामक मंडळाच्या ७० व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही."

ठराव क्रमांक ७२/२

"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ७१ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव कायम करण्यात येत आहेत."

ठराव क्रमांक ७२/३

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळांतर्गत उच्च न्यायालयातील न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी महामंडळाच्या पॅनलवरील वकीलांना दिनांक ०१/०४/२०१३ पासून पुढील कालावधीसाठी नवीन प्रकरणासाठी खाली नमूद केल्यानुसार विधी शुल्क देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (अ) | महामंडळामार्फत दाखल करावयाचे प्रकरणी | | | |
| | १) | जनहित याचिका | ..रु. | ३५,०००/- प्रती प्रकरण |
| | २) | रिट पिटीशन (Individual Relief) | ..रु. | २५,०००/- प्रती प्रकरण |
| | ३) | प्रथम अपिल | ..रु. | २०,०००/- प्रती प्रकरण |
| (ब) | महामंडळ गैरअर्जदार (Respondent) असणारी प्रकरणे | | | |
| | १) | जनहित याचिका | ..रु. | ३०,०००/- प्रती प्रकरण |
| | २) | रिट पिटीशन (Individual Relief) | ..रु. | २०,०००/- प्रती प्रकरण |
| | ३) | प्रथम अपिल | ..रु. | २०,०००/- प्रती प्रकरण |
| (क) | अंतरिम अर्ज | | ..रु. | १०,०००/- प्रती प्रकरण |

वरील विधी शुल्कापैकी ५० टक्के विधी शुल्क सुरुवातीला व उर्वरित ५० टक्के विधी शुल्क शेवटी अदा करण्यात यावे. जर Admission च्या वेळी प्रकरण निकाली निघाल्यास संपूर्ण फी देय होईल. तसेच तीन पेक्षा जास्त प्रकरणे एकत्रितपणे चालणार असतील (ग्रुप मॅटर) अशा वेळी वरील विधी शुल्काच्या जास्तीत जास्त तीन पट शुल्क देय राहील.

"मान्य"

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. शि. मा. उपासे) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ७२ वी बैठक दिनांक २७ फेब्रुवारी २०१३

**ठराव क्रमांक ७२/४**

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळांतर्गत न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी वकीलांना विधी शुल्का व्यतिरिक्त कोर्ट फी, प्रवास खर्च, वाहन खर्च, दूरध्वनी खर्च, लेखन सामुग्री व इतर अनुषंगिक खर्च करण्यासाठी, उच्च न्यायालयातील प्रकरणासाठी रु. ५,०००/-, जिल्हा न्यायालयातील प्रकरणासाठी रु. १,५००/-, व कामगार न्यायालय / औद्योगिक न्यायालय / मॅट मधील प्रकरणासाठी रु. १०००/- प्रती प्रकरण अशी ठोक रक्कम देण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे. तसेच तीन पेक्षा जास्त प्रकरणे एकत्रितपणे चालणार असतील (ग्रुप मॅटर) अशा वेळी वरील अनुषंगिक शुल्काच्या जास्तीत जास्त तीन पट शुल्क देय राहील. सध्या प्रगतीपथावरील न्यायालयीन प्रकरणांसाठी वरीलपैकी ५० टक्के रक्कम देय राहील. नवीन प्रकरणांसाठी ५० टक्के रक्कम प्रकरण सुरु होताना व उर्वरित ५० टक्के रक्कम प्रकरणाचा निकाल लागल्यानंतर देण्यास देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्रमांक ७२/५**

"ठराव करण्यांत येतो की, गुंजवणी धरण बुडीत क्षेत्रातील मौ. कानंद, ता. वेल्हा, जि. पुणे येथील गावठाणातील श्री. शिवाजी धोंडीबा निगडे यांचे घर क्र. ५५ चे नुकसान भरपाईपोटी उर्वरित रक्कम रु. १,२१,४२६/- (पूर्वी अदा केलेली रक्कम वजा जाता) सानुग्रह अनुदानातून अदायगी करणेबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्रमांक ७२/६**

"ठराव करण्यात येतो की, सन २०११-१२ या वर्षाच्या सोळाव्या वार्षिक अहवालास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर अहवाल शासनामार्फत विधीमंडळास सादर करण्याच्या कार्यवाहीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्रमांक ७२/७**

''ठराव करण्यांत येतो की, सन २०१०-११ या वर्षाचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या ताळेबंदाच्या लेखापरिक्षणानंतर महालेखापाल, मुंबई यांनी निर्गमित केलेला अलग लेखापरिक्षण अहवाल (S.A.R.) व त्यावरील अनुपालन अहवाल शासनामार्फत विधीमंडळास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे''.

**ठराव क्रमांक ७२/८**

"ठराव करण्यात येतो की, महामंडळांतर्गत मंजूर निविदांवरील कामे निविदा शर्तीनुसार मूळ ठेकेदारांकडून पूर्ण करुन घेण्यात यावीत. सदरची कामे सबलेट करण्यास परवानगी देण्यात

"मान्य"

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. शि. मा. उपासे) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

येऊ नये. तसेच याबाबत निविदा शर्तीमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"

ठराव क्रमांक ७२/९

"ठराव करण्यात येतो की, महामंडळांतर्गत कामे पूर्ण झालेल्या निविदा, धरणाच्या, पुनर्वसनाच्या व प्राधान्यामधील पण ठेकेदारांच्या अडचणीमुळे प्रलंबित कामांच्या निविदा अंतिम करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

| | |
|---|---|
| निविदा प्रकार-१: | ज्या निविदांवर ९० टक्के पेक्षा जादा कामे / खर्च झाला आहे, अशा निविदांची उर्वरित कामे (प्राधान्यक्रम व सलगता नसल्या तरीही) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात पूर्ण करुन निविदा अंतिम करण्यात याव्यात. |
| निविदा प्रकार-२: | घळभरणी झालेल्या धरणांच्या कामांच्या निविदा व पुनर्वसनाच्या कामाच्या निविदेअंतर्गत उर्वरित कामे प्रथम प्राधान्य देऊन सन २०१३-१४ मध्ये पूर्ण करण्यात यावीत व निविदा अंतिम करण्यात याव्यात. |
| निविदा प्रकार-३: | ज्या निविदांची कामे प्राधान्यामध्ये आहेत, तसेच त्यांच्यासाठी निधी उपलब्ध आहे, तथापि संबंधित ठेकेदार सदर निविदेचे काम अपेक्षित गतीने करीत नाही अशा कामांच्या निविदा, निविदा शर्तीनुसार अंतिम करण्यात याव्यात. |
| निविदा प्रकार-४: | देखभाल दुरुस्तीचा निधी पुढील वर्षात खर्च करता येत नसल्याने देखभाल दुरुस्तीच्या निविदा शक्यतो त्या त्या वर्षातच अंतिम करण्यात याव्यात. |
| निविदा प्रकार-५ | न्यायालयीन प्रकरणांच्या अडचणींमुळे, भूसंपादनाच्या अडचणींमुळे किंवा वन जमिनींच्या अडचणीमुळे जी कामे मागील दोन पेक्षा अधिक वर्षापासून बंद आहेत व नजिकच्या कालावधीत सुरु होण्यासारखी नाहीत अशा निविदा, निविदा शर्तीनुसार अंतिम करण्यात याव्यात. |

ठराव क्रमांक ७२/१०

"ठराव करण्यात येतो की, निरा देवघर प्रकल्प ता. भोर, जि. पुणे या प्रकल्पाचे उर्वरित काम सार्वजानिक खाजगी भागीदारीतून पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून प्राथमिक व्यवहार्यता अहवाल (Pre feasibility Report) तयार करण्यासाठी महाराष्ट्र अर्थिक विकास मंडळ (MEDC), मुंबई यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे रु. ३०.०२ लक्ष इतका खर्च करण्यास "निरा देवघर प्रकल्पाचा

"मान्य"

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. शि. मा. उपासे) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

**सुधारित तृतीय प्रकल्पीय अहवाल तयार करतांना त्यामध्ये या खर्चाची तरतूद करण्यात यावी." या अटीच्या अधीन राहून नियामक मंडळाची मंजूरी देण्यात येत आहे."**

**ठराव क्र. ७२/११**

**"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या अधिनियम १५ मधील कलम १८,१९,२८ व ३० नुसार महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील जलाशय व जलाशयाच्याभोवती पर्यटनाचा विकास करुन आर्थिक उत्पन्न (महसूल) निर्माण करणे व स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी पूर्व व्यवहार्यता अहवाल तयार करणे, पर्यटन विकसनासाठी कार्यप्रणाली निश्चित करणे यासाठी खाजगी सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्र. ७२/१२**

**"ठराव करण्यात येतो की, मौजे बारामती जिल्हा पुणे येथील सिटी सर्व्हे नंबर ५९५ व ५७७ पैकी ४ हेक्टर ११ आर क्षेत्र शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे निवासस्थाने बांधणेकरिता 'जलसंपदा विभागाच्या/महामंडळाच्या बारामती मुख्यालयात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना आवश्यक असणारी किमान ४० निवासस्थाने आरक्षित ठेवावीत. त्यांचे वाटप अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांच्या अखत्यारीत ठेवावे' या अटीवर जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे वर्ग करण्यास नियामंक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषय**

**ठराव क्र. ७२/१३**

**"ठराव करण्यात येतो की, जिल्हाधिकारी, पुणे व कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महाराष्ट्र विद्युत पारेषण कंपनी, पुणे यांनी मागणी केलेली मौजे पिंपळवंडी, ता. जुन्नर, जि. पुणे येथील कुकडी प्रकल्पाच्या मालकीची जागा सर्व्हे नं. १ अ (जुना-३२९) संपादित जमीनी पैकी ७१९० चौ. मी. जमिन ही ३३/११ के. व्ही. उपकेंद्र उभारण्यासाठी लागणार असल्याने शासकिय दराने होणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे कायमस्वरुपी वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."**

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**"मान्य"**

**सही/-**
**(इंजि. शि. मा. उपासे)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**सही/-**
**(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**